**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांची भारतीय विश्वविद्यालय संघ (ए.आय.यु.) च्या गव्हर्निंग काऊन्सिलवर निवड

## अमरावती विद्यापीठाला राष्ट्रीय स्तरावर बहुमान

अमरावती - (दि. ०९.०७.२०२२)

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांची भारतीय विश्वविद्यालय संघ (ए.आय.यु.) च्या सर्वोच्च गव्हर्निंग काऊन्सिलवर सदस्य म्हणून निवड झाली आहे. सेंट्रल झोनमधून त्यांची निवड झाली असून त्यांचा कार्यकाळ दोन वर्षाचा राहणार आहे. याबाबत नुकतेच भारतीय विश्वविद्यालय संघाच्या महासचिव डॉ. पंकज मित्तल यांचे पत्र विद्यापीठाला प्राप्त झाले आहे. भारतीय विश्वविद्यालय संघ (ए.आय.यु.) च्या गव्हर्निंग काऊन्सिलवर सदस्यपदी निवड झाल्याबद्दल कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांचे प्र-कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, सर्व प्राधिकारणींचे सदस्य, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व शिक्षण क्षेत्रातील गणमान्य व्यक्तींनी अभिनंदन केले आहे.

भारतीय विश्वविद्यालय संघ शैक्षणिक क्षेत्रातील शिखर संस्था असून भारतातील सर्व विद्यापीठे या संघाशी संलग्नित असतात. सर्व विद्यापीठांमध्ये संशोधनपर माहितीचे प्रसारण करणे, शैक्षणिक विकासासाठी विद्यापीठे, केंद्र व राज्य सरकारांमध्ये समन्वय प्रस्थापित करणे, संशोधन, अभ्यासक्रम, परीक्षा, प्रकाशन व इतर शैक्षणिक कार्याचा सातत्याने दर्जा सुधारणे, संशोधन प्रकल्पांसाठी भारतातील व विदेशातील विद्यापीठांमध्ये शिक्षक, विद्यार्थी यांची आदानप्रदान करणे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उच्च शिक्षणावर परिषदा, कार्यशाळा, सेमिनार आदींचे आयोजनात सहकार्य, क्रीडा विकास, त्याचा दर्जा सुधारणे, विद्यापीठांचा सहभाग वाढविणे, युवा कल्याण, विद्यार्थी माहिती सेवा, सांस्कृतिक कार्यक्रम, प्रौढ शिक्षण आदींना चालना देणे याशिवाय शैक्षणिक विकासासाठी ए.आय.यु. कार्य करते. कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांची ए.आय.यु. च्या सर्वोच्च अशा शिखर संस्थेच्या गव्हर्निंग काऊन्सिलवर निवड झाल्यामुळे त्यांच्या नेतृत्वात अमरावती विद्यापीठाच्या विकासासाठी फार मोठा हातभार लागणार आहे. त्यांच्या निवडीमुळे अमरावती विद्यापीठाला राष्ट्रीय स्तरावर बहुमान मिळाला आहे.

कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांचे अष्टपैलू व्यक्तीमत्व असून यापूर्वी त्यांनी पुणे येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये मेकॅनिकल विभागाचे विभागप्रमुख म्हणून तसेच ए.आय.सी.टी.ई. चे सल्लागार वर्ग - १ या महत्वपूर्ण पदावर कार्य केले आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला अल्पावधीतच त्यांनी विकासपथावर नेण्याचा प्रयत्न केला असून विद्यार्थीहितार्थ आणि विद्यापीठ विकासात्मक अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. त्यांच्या कार्यकाळात अनेक योजना व कामांची अंमलबजावणी सुद्धा झाली आहे. विशेष म्हणजे सी.बी.सी.एस. अभ्यासक्रम सर्व विद्याशाखांमध्ये लागू करण्यासाठी सर्व प्राधिकारणींच्या सहकार्याने त्यांच्या नेतृत्वाखाली अथक परिश्रम घेतल्या गेले आहेत.

कुलगुरू डॉ. मालखेडे यांची भारतीय विश्वविद्यालय संघाच्या गव्हर्निंग काऊन्सिलवर निवड झाल्यामुळे अमरावती विद्यापीठाच्या विकासामध्ये फार मोठी संधी त्यांच्या रुपाने निर्माण झाली आहे. त्यांचे सार्वत्रिक अभिनंदन करण्यात येत आहे.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

दि. ०९/०७/२०२२.

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

[C:\Users\PRO\Desktop\OM\UNIVERSITY NEWS 2022 169

This document was created with the Win2PDF “Print to PDF” printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/